# प्रा. डॉ. जगदीश चिंचोरे

## विद्यार्थीप्रिय शिक्षक, एक असामान्य व्यक्तिमत्त्व, द्रष्टा प्रशासक



**प्रा. शामकांत श्रीकांत देशमुख**
कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे ५.

**मी** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ येथे ऑगस्ट १९८६ साली रुजू झालो. प्रा. जगदीश चिंचोरे हे महाविद्यालयात १९७६ या सालापासून कनिष्ठ विभागात इंग्रजी विषयाचे अध्यापक म्हणून कार्यरत होते. माझी व श्री. चिंचोरे सरांची पहिली भेट मला अजूनही आठवते. त्याकाळी महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ विभागाच्या सर्व परीक्षांचे एकत्रित नियोजन केले जात असत. १९९७ साली मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. पदमाकर आपटे हे खूप कडक शिस्तीचे होते. विद्यार्थी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी हे त्यांना दबून राहत असत. परीक्षेचे पहिले सत्र सकाळी ७.३० वाजता सुरु होत असे. ६.४५ वाजता सर्वांनी महाविद्यालयात उपस्थित असणे अनिवार्य असे, तर ७.०० वाजता उत्तरपत्रिका घेऊन शिक्षकांनी वर्गावर जाणे अपेक्षित असे. अनेक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पब्लिक ट्रान्सपोर्टचा वापर करत. महाविद्यालयात वेळेवर पोहचण्याचा प्रयत्न करीत असत. काही जण दुचाकी तर काही जण सायकल वर येत असत. त्याकाळात महाविद्यालयात एकही चारचाकी वाहनतळावर पहायला मिळत नसे. किंबहुना कुणाकडेच चारचाकीच नव्हती ही वस्तुस्थिती होती, आत्ता परिस्थिती पूर्ण बदलली आहे. असो.

माझी श्री. चिंचोरे सरांशी पहिली ओळख १९९७ ला दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी असलेल्या परीक्षेच्या निमित्ताने अध्यापक कक्षात झाली. मी अध्यापक कक्षात असताना श्री. चिंचोरे सरांचे आगमन झाले. उंचपुरा, गव्हाळ वर्ण, खर्जातील त्यांचा आवाज (स्वर), चेहऱ्यावरील स्मित हास्य, पांढरा सदरा, तपकिरी रंगाची पॅंट, काळे बूट. आजही तो क्षण माझ्या डोळ्यासमोर तसाच आहे. त्यांनी मला गुड मॉर्निंग म्हणत शेक हॅन्ड करत ओळख करून घेतली. मी थोडा भीत–भीतच हात पुढे केला व माझी ओळख करून दिली. मी व्याख्याता म्हणून संगणक विभागात रुजू **झालो आहे असे सांगितले. साहजिकच मुळचे कुठले व शिक्षण कुठे झाले हे प्रश्न सरांनी विचारले.** मी मूळचा नगरचा व माझे पदव्युत्तर शिक्षण नाशिकला झाले असे सांगितल्यावर, सरांना खूप आनंद झाला. पुढे आम्ही ज्या–ज्यावेळी भेटत असू, त्यावेळी आवर्जून नाशिक व नगर बाबत विविध विषयांवर चर्चा करीत असू गप्पा मारत असू. हळूहळू ओळख वाढत गेली. सर उपप्राचार्य झाले. त्यांच्याबद्दल यापूर्वीच आदरयुक्त भीती, सन्मान होताच तो अजूनच वाढला. सर महाविद्यालयांचे तास चालू असतांना वर्गावर राऊंड घेत असत. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी त्यांना घाबरत असत. पण सर्वांची ही भिती त्यांच्या प्रती आदराने असे. चर्चेदरम्यान अध्यापन कक्षात विविध विषयांवर विचारमंथन होत असे. चिंचोरे सर देखील आपले मत परखडपणे मांडत. तर काही प्रसंगी मिश्किलपणे त्यांच्यातील विनोद बुद्धीने टिपण्णी करत. त्यावेळी मला आवर्जून जाणवत असे की चिंचोरे सरांचे मराठी, इंग्रजी, हिंदी या भाषेवरील अफाट

**सरांचे मॉडर्न महाविद्यालयातील योगदान हे फार मोठे आहे. त्याचा मी एक साक्षीदार आहे. महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम अथवा उपक्रम राबविण्याचे ठरले की, सरांचे नाव सर्वजण प्राधान्याने घ्यायचे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सरांकडे सर्व स्तरातील घटकांना विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व व्यवस्थापन यांना बरोबर घेऊन जाण्याची अफाट क्षमता होती.**

स्मृतिपुष्प



प्रभुत्त्व आहे. त्यांना वाचन अभ्यास, अवांतर वाचन, क्रीडा व कला साहित्याची विशेष गोडी असल्याचे जाणवले. यासर्व बाबी वेळोवेळी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून जाणवत होत्या. जसा काळ पुढे गेला तसे सरांबरोबरचे माझे संबंध दृढ होत गेले. ते शेवटपर्यंत तसेच राहिले हे मी माझे सौहार्दपूर्ण भाग्य समजतो.

**श्री. चिंचोरे सरांनी महाविद्यालयाच्या पहिल्या व दुसऱ्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेमध्ये दिलेले योगदान हे खरोखरच मोठे आहे. ज्यावेळी महाविद्यालयास नॅकद्वारे "अ" श्रेणी प्राप्त झाली त्यावेळी सरांनी उपप्राचार्य व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेचे सचिव या दुहेरी भूमिका समर्थपणे पार पाडल्या.**

सरांचे मॉडर्न महाविद्यालयातील योगदान हे फार मोठे आहे. त्याचा मी एक साक्षीदार आहे. महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम अथवा उपक्रम राबविण्याचे ठरले की, सरांचे नाव सर्वजण प्राधान्याने घ्यायचे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सरांकडे सर्व स्तरातील घटकांना विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व व्यवस्थापन यांना बरोबर घेऊन जाण्याची अफाट क्षमता होती. सरांचे काटेकोर नियोजन, व्यवस्थितपणा, माणसे पारखण्याची हातोटी, परिस्थितीचे भान, कार्यक्रम व उपक्रमाची मुख्य भूमिका, कामाचा आढावा, अनुभव, संघटन कौशल्य, झोकून देऊन काम करण्याची तयारी, यामुळे ते लीलया व सहजगत्या कार्यक्रम, विविध उपक्रम यशस्वीरित्या पार पाडत असत. विशेष म्हणजे आधीच्या कार्यक्रमात झालेल्या चुकीची, पुढच्या कार्यक्रमात व उपक्रमात पुनरावृत्ती होणार नाही हे ते कटाक्षाने पहात. तसेच प्रत्येक वेळी नवनवे प्रयोग व संकल्पना घेऊन ते कार्यक्रमाचे आयोजन करीत असत. हे त्यांचे एक वेगळेपण होते. ते शिस्तीच्या बाबतीत आग्रही असत. ते स्वतः देखील स्वयंशिस्तीचे पालन करीत. त्यामुळे सहकाऱ्यांनाही पालन करणे क्रमप्राप्त असे. सरांकडून वरील सर्व गोष्टी शिकायला मिळाल्या, अनुभवता आल्या त्यांचा फायदा वेळोवेळी मला आजही होत आहे. पूर्वी ११वी चा प्रवेश घेताना पालकांना व विद्यार्थ्यांना पसंतीच्या व आवडीच्या सर्व महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष जाऊन स्वतंत्र अर्ज करावा लागत असे. यासाठी मोठी पायपीट व कष्ट पडत असे व खर्चही वाढत असे. पण ११वीच्या प्रवेशाची ही पद्धत बदलून केंद्रीय पद्धतीने ११वी चे प्रवेश पुणे व पिंपरी–चिंचवड येथील कनिष्ठ महाविद्यालयात राबविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योगदान प्रा. चिंचोरे सरांचे राहिले आहे. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, सोपी करण्याच्या दृष्टीने अनेक विद्यार्थी–पालक व शैक्षणिक संस्था यांचे हित जपत अनेक बहुमूल्य सूचना श्री. चिंचोरे सरांनी केल्या. शेवटपर्यंत त्यांनी ११वी केंद्रीय प्रवेश समितीत विविध पदावर योगदान दिले आहे. मॉडर्न महाविद्यालयातील युवा सप्ताह, क्रीडा महोत्सव, वार्षिक स्नेह संमेलन, वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ, चर्चासत्रे, सेमिनार, कार्यशाळा यांचे नियोजन, आयोजन, प्रमुख पाहुणे, तज्ञ मार्गदर्शक, कार्यक्रमाची संपूर्ण व्यवस्था यामध्ये सर मोठी भूमिका बजावत असत.

मॉडर्न महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त १९९५ साली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरले होते. त्यावेळी प्रा. पद्माकर चिरपुटकर सर हे प्राचार्य होते. प्रा. चिरपुटकर सरांनी मोठ्या विश्वासाने श्री. चिंचोरे सरांकडे विविध कार्यक्रमाची जबाबदारी दिली होती. श्री. चिंचोरे सरांनी त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या मदतीने यशस्वीरित्या ती पार पाडली आणि प्रा. चिरपुटकर सरांचा त्यांच्यावरचा विश्वास सार्थ ठरविला. आजही अनेक सहकारी त्यावेळी आयोजित केलेल्या "सचिन नाईट", "मॉम करंडक" अंतरमहाविद्यालयीन द्वंद्व गीत स्पर्धा, क्रीडा महोत्सव, माजी विद्यार्थी मेळावा, स्नेहभोजन याचा आवर्जून उल्लेख करतात. एन.एस.एस. (N-S-S), एन.सी.सी. (N-C-C) चे दरवर्षी आयोजित करण्यात येणारे शिबीर, त्यांचे ठिकाण, व्यवस्था, व्याख्याते व त्यातील समाजोपयोगी उपक्रम हे ठरविताना देखील श्री. चिंचोरे सरांची मोठी मदत व सहभाग असे. ज्या–ज्यावेळी पालक, पाहुणे महाविद्यालयात येत. त्याचा संस्था व महाविद्यालयाच्या दृष्टीने कसा उपयोग होईल त्यांना कसे सहभागी करून घेता येईल. याकडे सरांचे कटाक्षाने लक्ष असे. दूरध्वनी, भ्रमणध्वनी याची नोंद ठेवून योग्य वेळी ते संबंधित व्यक्तीशी संपर्क करत असत, हे मी जवळून पाहिले आहे. सरांचा जनसंपर्क प्रचंड दांडगा होता. वास्तविक पाहता सर जरी मॉडर्न महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात कार्यरत असले तरी महाविद्यालयाच्या वरिष्ठ विभागातील सर्व उपक्रम व कार्यक्रमात ते सातत्याने व जबाबदारीने दिलेली भूमिका पार पाडत असत. त्यामुळे या सर्व उपक्रमातून आणि कार्यक्रमातून दैनंदिन शैक्षणिक कामकाजातून सर्वच विद्यार्थ्यांशी श्री. चिंचोरे सरांचा जवळून संबंध येत असे. त्यामुळे महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी सरांना ओळखत असत अनेक विद्यार्थ्यांचे सर खऱ्या अर्थाने "रोल मॉडेल" होते, नव्हे आहेत. एवढेच नाही तर माजी विद्यार्थी महाविद्यालयात येतात त्यावेळी ते आजही सरांची आठवण काढल्याशिवाय राहात नाहीत. आज एक शिक्षक म्हणून याच्याहून मोठा सन्मान नाही असे मला वाटते. श्री. चिंचोरे सर हे पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र शासनाचा "आदर्श शिक्षक" पुरस्काराने सन्मानित आहेत.

श्री. चिंचोरे सरांनी महाविद्यालयाच्या पहिल्या व दुसऱ्या नॅक मूल्यांकन प्रक्रियेमध्ये दिलेले योगदान हे खरोखरच मोठे आहे. ज्यावेळी महाविद्यालयास नॅकद्वारे "अ" श्रेणी प्राप्त झाली त्यावेळी सरांनी उपप्राचार्य व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेचे सचिव या दुहेरी भूमिका समर्थपणे पार



पाडल्या. शासन , विद्यापीठ, शालेय शिक्षण विभागाच्या कोणत्याही समितीची भेट महाविद्यालयात असली की सरांची भूमिका व योगदान मोलाचे असायचे. सर्व प्राचार्य, प्रशासन यांना सरांचा आधार वाटायचा असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

श्री. चिंचोरे सरांचे सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी सौहार्दपूर्ण संबंध होते. पण वैयक्तिक पातळीवर श्री. जयंत जोर्वेकर, श्री. राजीव कुलकर्णी, कै. श्री. दत्तात्रय लिमये, श्री. सुधीर वैशंपायन, कै. श्री. दिलीप खोपकर यांचे बरोबर मैत्री वेगळीच होती. श्री. चिंचोरे सर, प्राचार्य श्री. अनंत गोसावी सर व प्रा.डॉ. यशवंत वाघमारे हे डॉ. वाघमारे सरांच्या कडक शिस्तीमुळे किमान १ ते १.३० च्या दरम्यान दुपारचे जेवण डॉ. वाघमारे सरांच्या कक्षात घेत. त्यानिमित्ताने त्यांच्या चर्चा व गप्पा होत असत. अनेक वेळा प्रा. रामचंद्र लिमये हे देखील तेथे सहभागी होत. प्राचार्य गोसावी सरांच्या सेवानिवृत्तीनंतर प्रा.डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी प्राचार्यपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यांनादेखील प्रा. चिंचोरे सरांची मोलाची साथ व मार्गदर्शन लाभले व सरांच्या अनुभवाचा फायदा झाला.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यभारामध्ये श्री. चिंचोरे सरांचे योगदान हे मोलाचे ठरले आहे. सर सुरुवातीस संस्थेच्या आजीव सदस्य मंडळाचे सदस्य झाले. नंतर आजीव सदस्य मंडळाचे उपसचिव, सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. संस्था संचलित विविध शाळांच्या समितीचे अध्यक्ष व प्रमुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. त्यांच्यातील नेतृत्त्व गुणांमुळे त्यांना मा.प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे सरांनी अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या. त्यादेखील त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. शाळांचे अध्यक्ष, प्रमुख्याध्यापक या नात्याने शाळांमधून अनेक नवनवे उपक्रम पालक, विद्यार्थी, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी राबविले. या माध्यमातून संस्थेतील मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे समोर त्यांनी एक वेगळे प्रमाण व वस्तुपाठ घालून दिला. त्यामुळे शाळा, महाविद्यालयांची नावे जनमानसात सुपरिचित होण्यास मोठी मदत झाली. संस्थेचा वर्धापन दिन (अक्षय्य तृतीया), संस्थापक गुरुवर्य कै. शंकररावजी कानिटकर स्मृती दिन (२५ जानेवारी), कै. गुरुवर्य कानिटकर पुरस्कार सोहळा, वर्ष प्रतिपदा, गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभ, वार्षिक सर्वसाधारण सभा इत्यादी यांच्या नीटनेटक्या व रेखीव कार्यक्रमाच्या आयोजनात प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे, डॉ. माधव नामजोशी, प्रा. पदमाकर चिरपुटकर, प्रा. डॉ. अरविंद पांडे या ज्येष्ठ नियामक मंडळ सदस्यांचा विश्वास त्यांनी प्राप्त केला. महाविद्यालय व संस्थेतील श्री. चिंचोरे सरांच्या योगदानाची दखल घेत त्यांना संस्थेच्या सचिव / कार्यवाह पदाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आली.

**प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यभारामध्ये श्री. चिंचोरे सरांचे योगदान हे मोलाचे ठरले आहे. सर सुरुवातीस संस्थेच्या आजीव सदस्य मंडळाचे सदस्य झाले. नंतर आजीव सदस्य मंडळाचे उपसचिव, सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. संस्था संचलित विविध शाळांच्या समितीचे अध्यक्ष व प्रमुख्याध्यापक म्हणून काम पाहिले. त्यांच्यातील नेतृत्त्व गुणांमुळे त्यांना मा.प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे सरांनी अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या.**

श्री. चिंचोरे सरांनी ती जबाबदारीने खडतर परिस्थितीत यशस्वीपणे पार पाडली. सरांचा दांडगा जनसंपर्क, समोरच्या व्यक्तीला आपलसं करून घेण्याची लकब, पोलीस दलातील मैत्रीपूर्ण संबंध, प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या व्यक्तीशी असलेली सौहार्दपूर्ण संबंधाचा संस्थेस व संस्थेच्या शाळा, महाविद्यालयांना भरपूर लाभ झाला. संस्थेच्या शिशु विद्या मंदिर, पुणे ५, मॉडर्न प्री–प्रायमरी स्कुल शिवाजीनगर, पुणे ५ व संस्थेच्या एन.सी.एल. कॅम्पस मधील तिन्ही इंग्रजी माध्यमाच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय नावारूपाला आणण्यात सरांचा सिंहाचा वाटा आहे. सरांनी, या शाळांचा नावलौकिक जनमानसात उंचविण्याच्या दृष्टीने अथक परिश्रम घेतले. त्यामुळे या सर्व संस्थेच्या शाळा आजच्या या कठीण स्पर्धेत अग्रस्थानी आपले अस्तित्त्व टिकवून आहेत.

माझे नाव संस्थेच्या आजीव सदस्यपदी प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे सरांना श्री. चिंचोरे सरांनीच सुचविले होते. संस्थेच्या प्रथेप्रमाणे आजीव सदस्याची नेमणूक करण्यापूर्वी उमेदवाराची मुलाखत घेण्याची पद्धत आहे. माझी या पदासाठीची मुलाखत देखील प्राचार्य पदमाकर चिरपुटकर सर, डॉ. अरविंद पांडे व श्री. चिंचोरे सर यांनी घेतली होती. व आजीव सदस्य, संस्था घटना व तरतुदी काम करण्याची आवड याबाबी विशद करून सांगितले होते त्याचा मला आजही संस्थेच्या दैनंदिन कामकाजात उपयोग होत आहे.

श्री. चिंचोरे सर हे नियत वयोमानानुसार महाविद्यालयातील ३६ वर्षे प्रदीर्घ सेवेतून दि. ३१/०५/२०११ रोजी सेवा निवृत्त झाले. परंतु तदनंतर देखील प्रा.डॉ. गजानन र. एकबोटे सरांनी त्यांना संस्थेच्या आजीव कार्यकर्ता मंडळाचे सदस्यत्व देऊन, नियामक मंडळात सामावून घेतले. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी मोठ्या नेटाने पीएच.डी. ही मानाची पदवी संपादन केली. श्री. चिंचोरे सरांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून करिअर कौन्सिलिंग केले. अनेक वर्तमानपत्रात लेख लिहिले. रेडिओ व टेलिव्हिजनच्या वाहिन्यांवरून चर्चासत्रात सहभाग घेतला, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले.

श्री. चिंचोरे सरांच्या सेवानिवृत्तीनंतर डॉ. एकबोटे सरांनी संस्थेच्या सचिव पदाची जबाबदारी माझ्यावर सोपविली. खरतर लहान वयात एवढ्या मोठ्या संस्थेच्या सचिव पदाची जबाबदारी मला मिळाल्यानंतर मनावर फार



मोठे दडपण होते पण डॉ. एकबोटे सर व श्री. चिंचोरे सर प्रा. चिरपुटकर सर, प्रा.डॉ. पांडे सर, प्रा. गोसावी सर यांच्या बरोबर आधीपासून काम केले असल्यामुळे व त्यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असल्याने आत्तापर्यंत हे काम करू शकलो व ते करणे शक्य झाले त्यामुळे मी या सर्वांचा ऋणी मनापासून सदैव ऋणी आहे.

प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे सरांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अधिसभेपुढे संस्था चालकांच्या गटातून संस्थेच्या वतीने मला २०१७ ला संधी दिली. त्यावेळी आवर्जून नाशिक, येवला, सिन्नर, मालेगाव या भागातील संस्थाचालकांना प्रचारा दरम्यान भेटीसाठी प्रा.डॉ. चिंचोरे सर व ॲड. डॉ. चिंतामणी घाटे यांच्यावर जबाबदारी दिली होती. आम्ही हा भाग दोन–तीन भेटी दरम्यान पिंजून काढला होता. त्याहीवेळी प्रा. डॉ. चिंचोरे सरांच्या जनसंपर्काचा अनुभव आम्ही जवळून घेतला. सर अधून मधून त्या भागातील मंडळी भेटल्यानंतर आहिराणी भाषेत संवाद साधत.

कौटुंबिक स्तरावर देखील सरांनी एक आदर्श पती व पिता म्हणून जबाबदारी पार पाडली आहे. सरांच्या पत्नी सौ. उज्ज्वला चिंचोरे वहिनी या व्यवस्थापक पदावरून बँकेतून नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. खऱ्या अर्थाने एका यशस्वी पुरुषामागे त्या खंबीरपणे उभ्या होत्या, म्हणून सरांना ह्या सर्व गोष्टी करणे शक्य झाले व आयुष्यातील सरांच्या या प्रवासातील वहिनींची साथ खूप मोलाची ठरली. सरांनी व वहिनींनी आपल्या दोन्ही मुलांना चि. कु. कल्याणी व चि. यशोधन यांना उच्च शिक्षण दिले. दोन्ही मुले आज उच्च विद्याविभूषित असून नामांकित माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या माध्यमातून सेवा देत आहेत. दोघांचेही विवाह थाटामाटात सरांनी व वहिनींनी लावून दिले असून दोघेही आपल्या जीवनसाथीदारांबरोबर, मुलांबरोबर आनंदाने संसार करीत आहेत. खरतर वहिनीच्या सेवानिवृत्तीनंतर थोडी सवड व वेळ इतर गोष्टीसाठी मिळाला असता परंतु नियतीला ते मान्य नव्हते.

प्रा.डॉ. चिंचोरे सरांना थोडा अस्थम्याचा त्रास होता. दरवर्षी थंडीत सर त्याबाबत जास्त जागरूक असायचे. प्रसंगी त्यांना काही वेळा दवाखान्यात दाखलही करावे लागत असे पण एक दोन दिवस उपचारानंतर सुखरूप घरी सोडले जात असे. कोरोना कोविड १९ चा प्रादुर्भाव वाढत असल्याने सर खूप जागरूक असत डिसेंबर महिन्यातील एका मीटिंगला आल्यावर ते मला एवढेही म्हणाले मला यशोधनने हा वेगळ्या प्रकारचा फेस मास्क पाठविला आहे. चेहऱ्यावर पीव्हीसी प्लास्टिक शिल्ड परिधान केले होते. खबरदारीचे सर्व उपाय ते घेत होते. अचानक सरांना दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल केल्याचे कळाले. त्यांना नेहमीप्रमाणे हिवाळ्यात थोडा त्रास होतो, असा झाला असणार असे वाटले. तरी देखील मी हॉस्पिटल गाठले. कोरोना कोविड मुळे रुग्णांच्या भेटीवर मोठे निर्बंध होते. तरी प्रयत्नपूर्वक भेटण्यासाठी गेलो पण बोलणे होऊ शकले नाही. सरांच्या बंधुंशी व मित्र परिवार व ॲड. घाटे यांच्याशी सातत्याने त्यांच्या प्रकृती स्वास्थ्याविषयी चौकशी करत होतो. सरांची कोरोना चाचणी निगेटिव्ह आल्याने मोठे हायसे वाटले व सुटकेचा निश्वास सोडला. पण हळूहळू त्यांची तब्येत खालवत गेली. दि. २१/०१/२०२१ रोजी त्यांची प्राणज्योत मावळली. ही बातमी माझ्या पर्यंत येऊन पोहोचताच मी नि:शब्द झालो. काही सुचेनासे झाले, फोन करणे भ्रमणध्वनी वरून संदेश पाठविणे. संदेश टाईप करणे यासर्व माझ्यासाठीच्या सोप्या गोष्टी अवघड झाल्या. हात चालेना. बोटे चालेना, बोलता येईना अशी परिस्थिती झाली. श्री. चिंचोरे सर आपला एक उमदा सहकारी, मार्गदर्शक, मोठा भाऊ आज आपल्यात नाही हे वास्तव होत. कसाबसा सावरून मी वैकुंठ स्मशान भूमीत अंत्यसंस्कारासाठी पोहचलो. अंत्यसंस्काराचे विधी संपन्न झाले. आत्तापर्यंत मी अनेक वेळा वैकुंठ स्मशानभूमीत श्रद्धांजली पर भाषणे केली. पण त्यादिवशी मी जेमतेम बोलू शकलो. खूप साऱ्या आठवणी, भावना दाटून आल्या होत्या पण त्या सावरून दोन शब्द संस्थेच्या वतीने श्रद्धांजली पर भाषणात बोललो. तदनंतर संस्थेत आयोजित केलेल्या शोक सभेत देखील मनावर दगड ठेवून अतिशय धिराने व संयमाने प्रास्ताविक केले. प्रा.डॉ. चिंचोरे सरांच्या प्रती भावना व्यक्त करू लागलो पण मी सर्व प्रथम भावनांना आवर घालू शकलो नाही व मला अर्ध्यावरच भाषण व मनोगत व्यक्त करता आले. आपल्यापैकी बरेच जण याचे साक्षीदार आहात याची मला कल्पना आहे. ॲड. चिंतामणी घाटे सर यांना देखील भावनांना आवर घालता आला नाही. नंतर आम्ही दोघे माझ्या कक्षात आल्यावर ओक्साबोक्शी रडलो.

कुठेतरी मनात येऊन गेलं सर मृत्यूशी झुंज देत असतांना मॉडर्न महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता समारंभ श्री. भगतसिंह कोश्यारी मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दि. १९/०१/२०२१ रोजी होणार होता. त्यानिमित्ताने अनेक वर्तमानपत्रातून महाविद्यालायाविषयी लेख प्रसिद्ध झाले. त्यात श्री. चिंचोरे सरांच्या महाविद्यालयातील व संस्थेच्या योगदानाचा पण आवर्जून उल्लेख होता. मॉडर्न महाविद्यालयांच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाची सांगता समारंभाच्या कार्यक्रमात सरांची अनुपस्थिती जाणवली पण मला खात्री आहे ते सभागृहात होते. तो कार्यक्रम त्यांनी पाहिला, अनुभवला व कार्यक्रम संपूर्ण यशस्वी होऊस्तर ते मृत्यूशी झुंज देत होते. मलातर असे वाटते त्यांनी यमदेवाला सुद्धा विनंती केली असेल संस्थेचा व महाविद्यालयाचा हा कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होऊ देत मग मला घेऊन जा....!

शेवटपर्यंत महाविद्यालय व संस्थेशी वाहून घेतलेल्या या विद्यार्थीप्रिय शिक्षकास, द्रष्टा प्रशासकास, असामान्य कर्तृत्ववान व्यक्तीस भावपूर्ण आदरांजली ..... !

स्मृतिपुष्प



**– प्रा. शामकांत श्रीकांत देशमुख**
**कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह**
**एज्युकेशन सोसायटी, पुणे ५.**